**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** ब्रम्हपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0518 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/06/2026 02:45

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 10/06/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/06/2026

**Time From (वेळेपासून):** 16:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/06/2026 **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/06/2026 02:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तालुका आरोग्य अधीकारी कार्यालय,ब्रम्हपूरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): आशा विश्वभर भानारकर
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दिघोरी,ब्रम्हपुरी,ब्रम्हपूरी,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दिघोरी,ब्रम्हपुरी,ब्रम्हपूरी,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9823270581

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुदेश ज्ञानेश्वर महाडोळे | | | 1. तालुका आरोग्य अधीकारी , ब्रम्हपूरी ,ब्रम्हपूरी,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | vivo कपनीचा | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू दराच्या 10 नोटा | 5,000.00 |
| 3 | इतर | घरगुती वस्तु | 01 सीमेंट रंगाचा फुल पॅन्ट | 0.00 |
| 4 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | 3 मेमोरी कार्ड SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पोलीस

ठाणे, ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर

दिनांक 11/06/2026

माझे नाव अनिल मोहनरेड्डी जिड्डावार, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस उप अधीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर, मो.क्र. 9823270581

समक्ष पोलीस ठाणे ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की, मी माहे मे/2026 पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे कार्यरत आहे.

दिनांक 10/06/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय चंद्रपूर येथे हजर असतांना वेळ 12/00 वा. दरम्यान एक महिला कार्यालयात हजर येवून लाच मागणी संबधाने तक्रार द्यावयाची आहे असे सांगितल्याने त्यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रारीसंबधाने विचारणा केली असता तक्रारदार महिलेने आपले नाव सौ. आशा विश्वभंर भानारकर, वय 48 वर्षे, धंदा- आशा वर्कर रा. दिघोरी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर असे सांगून त्यांना सुचीत केलेवरून त्यंानी हस्तलिखीत तक्रार सादर केली

सदर तक्रारीवरून लाच मागणीची पडताळणी करून पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजीत करण्यासाठी आमचे कार्यालयातील पोशि/रविकांत इंगळे यांचे हस्ते राज्यकर सहआयुक्त , वस्तु व सेवा कर कार्यालय चंद्रपूर यांना पत्र देवून दोन षासकीय पंच नामे श्रीमती रश्मी नारायणराव मलकापूरे, वय 34 वर्षे, धंदा-नौकरी, कर सहायक, व श्री अजय पुरूषोत्तम दुबे, वय 33 वर्षे,धंदा-नौकरी, कर सहायक, वस्तु व सेवा कर कार्यालय चंद्रपूर यांना उपलब्ध करून घेतले.

त्यांनतर दोन्ही पंचाना तक्रारदार सौ. आशा विश्वभंर भानारकर, यांनी एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने दिलेल्या तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करून कायदेषीर कार्यवाही करावयाची आहे असे सांगून सदर कार्यवाहीत पंच म्हणून काम करण्याची संमती विचारली असता दोन्ही पंचानी पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्षविल्याने त्यांचे संमतीपत्र घेण्यात आले. त्यावरून पंच क्र. 1) श्रीमती रश्मी नारायणराव मलकापूरे, कर सहायक, व पंच क्र. 2) श्री अजय पुरूषोत्तम दुबे, कर सहायक हे काम पाहणार असल्याचे ठरविण्यात आले.

सापळा पार्टीतील सदस्य पोहवा/रविकांत इंगळे, पोहवा/हिवराज नेवारे, पोहवा विजेंद्र वाढई, पोशि/प्रदीप ताडाम, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, मपोशि/मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिष सिडाम, सर्व ला.प्र.वि. चंद्रपूर व चापोशि संदीप कौरासे मो.प.वि.चंद्रपूर तसेच तक्रारदार यांचा नमूद दोन्ही पंचांना परिचय करून देवून तक्रारदार सौ. आशा विश्वभंर भानारकर यांचीच लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगण्यात आले.
त्यांनतर आम्ही, तक्रारदार सौ. आशा विश्वभंर भानारकर यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिलेली तक्रार दोन्ही पंचांना

वाचावयास दिली ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यांनतर आमचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबधी तोंडी विचारपूस केली असून तक्रारदाराची तक्रार खालीलप्रमाणे आहे.

''माझे नाव:- सौ. आशा विश्वभंर भानारकर, वय 48 वर्षे, धंदा- आशा वर्कर, रा. दिघोरी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर मो.क्र. 7875410180

सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी माझे कुटुंबासह वरिल पत्यावर राहत असून सन 2008-09 पासून दिघोरी गावात आशा वर्कर म्हणुन काम पाहते. मी गावातील आरोग्य सुधारणे, जनजागृती करणे व प्राथमीक उपचाराकरीता रूग्णांना मदत करण्याचे काम करते. याकरीता मला शासनाकडून दरमहा दहा हजार रूपये मानधन मिळते. तसेच माझे कार्यक्षेत्रातील माता, बाल आरोग्य सेवा व लसीकरण, साथीचे व संसर्गजन्य आजार नियंत्रण, बैठका आणि अहवाल इत्यादी महिनाभर केलेल्या सर्व कामांचे बिल (प्रोत्साहन भत्ता) तयार करून गट प्रवर्तकांकडे फार्म जमा करते, ते त्या बिलाची तपासणी केल्यानंतर बीसीएम आणी तालुका कार्यालयाकडून मंजुरी देतात. त्यानंतर त्या बिलाची रक्कम माझे बँक खात्यात जमा होते.

माहे ऑक्टोंबर/2025 ते माहे एप्रिल/2026 (माहे डिसेंबर/2025 वगळून) मी माझे दिघोरी गावातील कार्यक्षेत्रात केलेल्या वरिल कामासंबधी प्रोत्साहन भत्ता बिल तयार करून गट प्रवर्तकांकडे दिले होते. त्यावरून त्यांनी त्या बिलाची तपासणी करून ते बिल तालुका समुह संघटक (बीसीएम) व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर येथे पाठविल्याने बिल मंजुर होवून प्रोत्साहन भत्ता बिल माझे पोस्टाचे बँक खाते क्र. 032110652078 यावर दिनांक 9/5/2026 रोजी 33,631/- रूपये जमा झाले आहे.

त्यांनतर मला तारीख दिवस आठवत नाही, परंतु मी माझे आशा वर्करचे कामाने तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ब्रम्हपुरी येथे गेली असता तेथील श्री. सुदेश महाडोळे, बीसीएम यांनी मला बोलावून ''तुझे ऑक्टो ते एप्रिल, डिसेंबर वगळून एकुण 06 महिण्याचे प्रोत्साहन भत्ता बिलाची अंतिम तपासणी व पडताळणी करून ते बिल मी समोर पाठविल्यानेच तुझे बिल मंजुर होवून तुझे बँक खात्यात पैसे जमा झाले आहे, तरी मी केलेल्या कामाचे 5,000/- रूपये मला दे.'' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना माझेकडे पैशाचे काम असल्याने मी पैसे देवू शकत नाही, असे म्हणाली. तर त्याने ''पैसे दिले नाही तर, पुढच्या वेळेस बिलामध्ये खोटी माहीती देत आहे म्हणुन बिल थांबविणार.'' असे म्हणाल्याने मी घाबरून जावून ''सध्या माझेकडे पैसे नाही, नंतर येवून भेटते.'' असे म्हणुन तिथून निघून गेली.

त्यानतर काल दिनांक 9/6/2026 रोजी घरी हजर असतांना दुपारी 1/36 वा. दरम्यान श्री. सुदेश महाडोळे, बीसीएम यांचा त्यांचे मोबाईल क्र. 8208397928 वरून माझे मोबाईल क्र. 7875410180 यावर फोन आला व त्यांनी पैसे आणून दिले नाही म्हणुन विचारणा केली तर मी बाहेर असल्याचे सांगून उदयाला येवून भेटते म्हणुन फोन ठेवून दिला.

मला श्री सुदेश महाडोळे, तालुका समुह संघटक (बीसीएम), तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांना 5,000/- रूपये लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी आज दिनांक 10/06/2026 रोजी दुपारी 11/30 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन आपणास भेटुन वरिल प्रमाणे हकीकत सांगून लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगितले असता आपण मला लेखी तक्रार देण्यास सांगितले. त्यावरून मी आपणास माझे हस्ताक्षरात श्री सुदेश महाडोळे, तालुका समुह संघटक (बीसीएम), तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांचेविरूध्द लेखी तक्रार देत आहे. गैरअर्जदार श्री सुदेश महाडोळे, यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नसुन त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. माझे वैयक्तिक बचतीतील 5,000/- रू. लाच रक्कम वापरण्याकरीता देत आहे.

तरी माझे माहे ऑक्टोंबर/2025 ते माहे एप्रिल/2026 (माहे डिसेंबर/2025 वगळून) केलेल्या आशा वर्कर कामाचे प्रोत्साहन भत्ता बिलाची अंतिम तपासणी करून पुढे पाठविल्याने बिल मंजुर होवून बँक खात्यात जमा झाल्याने केलेल्या कामाचे मोबदला (बक्षीस) म्हणुन 5,000/- रूपयाची लाचेची मागणी करणारे श्री सुदेश महाडोळे, तालुका समुह संघटक (बीसीएम), तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांचेविरूध्द कार्यवाही होणेस विनंती आहे.''

अशाप्रकारे तक्रारदार महिलेने दिलेली तक्रार व त्यांनी तक्रारीसंबधी तोंडी कथन केलेला मजकूर सारखाच असल्याची दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचानी व आम्ही तक्रारीवर सही केली. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे बँक खात्यात प्रोत्साहन भत्याची रक्कम जमा झाले असल्याबाबत बँक स्टेटमेंटची प्रत आमचेकडे दिल्याने त्याची छायान्कीत प्रत काढून आम्ही पंचानी व तक्रारदार यांनी सहया केल्यावर ती कागदपत्रात समाविष्ट केली. त्यांनतर तक्रारदार यांचेकडील लाचेत वापरण्यात येणारे 5,000/-रूपयांचे नोटांचे क्रमांक संगणकावर टंकलीखीत करून त्यांची प्रिंट काढुन त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी सहया केल्या. वरील नोटा व नोटांचे क्रमांक

नमुद असलेली प्रत आम्ही आमच्या ताब्यात घेतल्या.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचाना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणा-या ऑथ्रा◌ॅसीन पावडर व अल्ट्राव्हा◌ॅयलेट दिव्याचा उपयोगाबाबत माहीती देवून ऑथ्रासिन पावडरचा संपर्क आलेल्या भागावर अल्ट्राव्हॅ◌ायलेट दिव्याचे प्रकाशात पाहिल्यास पावडरला निळसर रंगाची चकाकी दिसुन येते असे सांगीतले व त्याबाबत पोहवा/विजेंद्र वाढई यांचे हस्ते प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यानंतर पोहवा/विजेंद्र वाढई यांना सापळा पार्टीतुन वगळण्यात आले. तसेच आमचे कार्यालयीन डिजीटल व्हा◌ॅईस रेकार्डर बाबत माहिती दिली व त्याचे काम करण्याची पध्दतीबाबत पोहवा/हिवराज नेवारे यांचे मार्फतीने माहिती देण्यात आली असून याबाबत सविस्तर नोंद प्रात्यक्षिक पंचनामा मध्ये घेण्यात आलेली आहे.

त्यानंतर तक्रारदाराने तक्रारीत सांगितल्याप्रमाणे श्री. सुदेश महाडोळे, बीसीएम, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ब्रम्हपुरी यांना आज रोजी कार्यालयात येवून भेटते असे सांगितले असल्याने पुढील पडताळणी/सापळा कार्यवाही ब्रम्हपुरी येथे जावून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या).

त्यानंतर लाच मागणी पडताळणी/सापळा कार्यवाही करीता दिनांक 10/6/2026 रोजी आम्ही, ट्रॅप बॅगमध्ये अल्ट्राव्हायलेट दिवा (टा◌ॅर्च), काळा कपडा, सिल करण्याचे साहित्य, मोजमाप करण्याचा टेप, 4 नविन मेमरी कार्ड, व्हाईस रेका◌ॅर्डर, ऑन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रकमेचा लिफाफा, लाच रक्कमेचे क्र. असलेले जप्तीपत्रक व लेबल फार्मट असलेली प्रिन्ट व स्टेशनरी साहीत्य बरोबर ठेवुन असल्याची खात्री केली. शासकिय लॅपटा◌ॅप, लॅपटा◌ॅपचे चार्जर, प्रिन्टर, इत्यादी साहित्य त्यांचे जोडणीसह सोबत घेवून आम्ही, सोबत तक्रारदार व दोन्ही पंच, पोहवा हिवराज नेवारे, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, चापोशि सतिश सिडाम असे शासकिय वाहन क्र. MH34 CR 4749 व पो.नि. सचिन धर्मेजवार, पोहवा रविकांत इंगळे, पोशि/प्रदिप ताडाम, मपोशि/मेघा मोहुर्ले असे शासकिय वाहन क्र. MH 34 CJ 1533 ने मध्ये बसून 14/00 वा. ला.प्र.वि. चंद्रपूर येथून रवाना होवून मुल, सिंदेवाही, नागभीड मार्गे ब्रम्हपुरी शहर परिसरातील निर्जन स्थळी 16/20 वा. दरम्यान पोहचलो. त्यानंतर तक्रारदाराचे तक्रारीबाबत सर्वाना थोडक्यात सांगून तक्रारदार व पंच तसेच सापळा पथकास पडताळणी कार्यवाहीबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर गै.अ. श्री. सुदेश महाडोळे, बीसीएम, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ब्रम्हपुरी यांची लाचेची मागणी पडताळणी करणे असल्याने, पडताळणी कार्यवाही अनुशंगाने पंच क्र 1 यांचे हस्ते तक्रारदार हिची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच क्र. 01 यांना गैरअर्जदारांची प्रत्यक्ष भेट घेवून सत्यता पडताळणी करण्याकरीता पाठवितांना पडताळणी कार्यवाहीबाबत तक्रारदार व पंच क्र. 1 यांना सविस्तर सुचना दिल्या.

सापळा पडताळणी कार्यवाहीकरीता आमचे सुचनेवरुन पो.हवा. हिवराज नेवारे यांनी SanDiskकंपनिचे 32GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5127XV8324VN असे प्रिंट असलेले नवीन मेमरी कार्ड टाकुन असलेले व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर वेळ 16/40 वा. रेका◌ॅर्डीग सुरु करून पंच क्रं. 01 यांचे आवाजात तक्रारदार यांचेसह लाच रक्कमेच्या पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबत प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर मपोशि मेघा मोहुर्ले हिचे हस्ते तक्रारदार यंच्या गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना वेळ 16/43 वा. पायदळ रवाना केले. आम्ही सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र. 2 आम्ही थांबून असलेल्या ठिकाणी वाहनातच तक्रारदार यांची परत येण्याची वाट पाहत थांबून राहीलो

त्यानंतर तक्रारदार हे पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबून असलेल्या ठिकाणी वेळ 16/53 वा. परत आल्यावर आमचे सुचनेवरुन मपोशि मेघा मोहुर्ले यांनी तक्रारदाराचे गळ्यातील व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर बाहेर काढला व पोहवा/हिवराज नेवारे यांनी पंच क्र. 1 यांच्या आवाजात वेळ 16/57 वा. बंद केले. त्यानंतर पंच क्र. 1 यांचे कडुन तक्रारदार हिची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले.

त्यानंतर पंच क्र. 1 यांना घडलेल्या घटनेक्रमाबाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की, तक्रारदारासह ते गैरअर्जदार यांचे कार्यालयाजवळ जावून त्यांना फोन लावून फोन स्पिकर मोडवर ठेवुन कार्यालया समोर हजर आल्याचे बोलणी केल्यानंतर गै.अ. हे लगेच बाहेर आले तेव्हा त्यांनी मला बाहेरच थांबण्यास सांगून तक्रारदार हिला सोबत कार्यालयात घेवून गेले तरी मी सुध्दा त्यांचे मागे-मागे गेली व कार्यालयचे व-हांडयात थांबून राहीली. काही वेळानी तक्रारदार ही गै.अ. यांचे सोबत बोलणी करून बाहेर आल्याने आम्ही दोघेही आपण थांबून असलेल्या

ठिकाणी परत आलो असे सांगितले. त्यावरून तक्रारदार यांना त्यांचे व गैरअर्जदार यांचे झालेल्या संभाशणाबाबत विचारणा केली असता तक्रारदार हिने पंच क्र. 1 यांनी वरील सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. तसेच तिने सांगितले की, ती गैरअर्जदाराने सांगितल्यावरून त्यांचे टेबल समोरील खुर्चीवर बसली. त्यानंतर गैरअर्जदाराषी बोलणी केली त्यादरम्यान गैरअर्जदाराने माझे बॅक खात्यात 33,631/- रू जमा झाल्याने पाचंच दयांन ताई, मी जास्त नाही मागत आहे'' असे म्हणुन प्रोत्साहन भत्ता बिलाची रक्क बॅकेत जमा झाल्याचे सांगून त्या केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन 5,000/- रूपयाची लाचेची मागणी केली तेव्हा थोडयावेळानी आणुन देतो असे म्हणुन पंचासह थांबलेल्या ठिकाणी परत आलो असल्याचे सांगितले.

सदर संभाषण व्हाॅईस रेकाॅर्डरच्या मेमरी कार्ड मध्ये '' Folder01'' मधील फाईल क्र 260610_1640 मध्ये रेकाॅर्ड झाले असून सदर संभाषण शासकीय लॅपटाॅपमध्येे काॅपी करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, पंच क्र. 1 व तक्रारदाराने सांगितलेल्या हकीकत व त्यांनी दिलेल्या दुजो-यावरून तसेच तक्रारदार व गैरअर्जदार यचेत झालेल्या संभाषणावरून श्री. सुदेश महाडोळे, तालुका समुह संघटक, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ब्रम्हपुरी यांनी तक्रारदार यांना त्यांचे आशा वर्कर कामाचे प्रोत्साहन भत्ता बिलाची अंतीम तपासणी करून ते बिल समोर पाठविल्याने बिल मंजूर झाल्याचे सांगून काम करून देण्याचे मोबदल्यात 5,000/- लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्षविल्याचे आमचे व दोन्ही पंचांचे स्पष्ट मत झाले. त्यावरून आम्ही तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांचेसह गै.अ. यांचेकडे सापळा कार्यवाही करीता पाठविण्याचा सर्वानुमते निर्णय घेतला. सदर कार्यवाही संपताच शब्दःश स्क्रिप्ट तयार करण्याची तसेच पडताळणी कार्यवाही मेमरी कार्डची हॅशव्हॅलु काढल्यानंतर जप्ती करण्याची तजवीज ठेवली आहे.

सापळा कार्यवाही पुर्वी तक्रारदार यांची पंच क्र. 1 यांचे हस्ते अंगझडती घेवुन हस्तलिखीत अंगझडती तयार करण्यात आली. सापळा कार्यवाही संबंधाने तक्रारदार व पंच क्र. 1 व 2 यांना सुचना देण्यात आल्यात तसेच स्टाफ यांना आपापल्या भुमिकेबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी लाचरक्कम 500 रू. दराच्या 10 चलनी नोटा असे 5,000/- रुपये आपले उजवे हाताने घेवुन तक्रारदार हिचे कथ्या रंगाचे लेडीज पर्सचे समोरील खाण्यात ठेवले व पंच क्र. 2 यांनी बाॅटल मधील पाण्याने हात स्वच्छ धुवुन घेतले.

त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पोहवा/हिवराज नेवारे यांनी SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV 5614MP असे प्रिंट असलेले नवीन मेमरी कार्ड व्हाईस रेकाॅर्डर मध्ये टाकुण इंटरनल व मेमरी कार्ड मध्ये पुर्वीची कोणतीही फाईल नसल्याबाबत खात्री करून दिली. तसेच पोहवा/रविकांत इंगळे यांना लाचरक्कम जप्ती व आरोपीचे अंगझडीचे व्हिडीओ चित्रीकरण्याबाबत सुचना दिली असता त्यांनी कार्यालयीन Sonyकंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरामध्ये SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5127XV83260 असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड टाकुन त्याचे ताब्यात घेतले.

त्यानंतर पोहवा/हिवराज नेवारे यांनी वरीलप्रमाणे मेमरी कार्ड टाकुन असलेले व्हाईस रेकाॅर्डरमधील 17/23 वा. रेकाॅर्डींग सुरू करून पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर मपोशि/मेघा मोहुर्ले हिने डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर तक्रारदार यांच्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना वेळ 17/25 वा. पायदळ रवाना केले. त्यांचे मागोमाग आम्ही, पोलीस निरीक्षक सचिन धर्मेजवार, पंच क्र. 2 व पोहवा/हिवराज नेवारे, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, मपोशि मेघा मोहुर्ले असे शासकीय वाहनातुन उतरूण गैरअर्जदाराचे कार्यालय परिसरात आजुबाजुला कुणालाही संषय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीलो. काही वेळानी तक्रारदार ही कार्यालयाचे बाहेर येऊन गैरअर्जदाराने लाच स्विकारल्याबाबत आपले गळयातील दुपट्टा डाव्या हातानी काढून डाव्या हातातच ठेवून नियोजीत इशारा केला. तेव्हा आम्ही व सोबत असलेले पंच क्र. 2 व स्टाॅफ हे घटनास्थळी आलो व तक्रारदार महिलेस बाजुला थांबूॅन राहण्याबाबत इशारा करून गैरअर्जदार यांना त्याचे टेबलवर बसवून आम्ही, पंच क्र. 01 यांना लाच रक्कम कुणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी खुर्चीवर गै.अ. यांचेकडे बोट दाखवून सदर इसम गै.अ. सुदेश महाडोळे असून त्यांनीच लाच रक्कम घेतली असे सांगितले. त्यानंतर पोहवा/हिवराज नेवारे यांचे हस्ते पंच क्र. 1 यांचे आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हाईस रेकाॅर्डर 17/34 वा बंद करण्यात आले.

आम्ही गै.अ. सुदेश महाडोळे यास सापळा कार्यवाही कामी सहकार्य करण्यास सांगून त्यांचे संपूर्ण नाव, पत्ता इ. माहिती विचारली असता त्याने आपले नाव- सुदेश ज्ञानेष्वर महाडोळे वय 40 वर्ष, धंदा नोकरी पद तालुका समुह संघटक,(कंत्राटी) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर रा. श्री. भुते यांच्या घरी किरायाने नागेष्वर नगर, मालडोंगरी रोड, ब्रम्हपुरी असे सांगितले.

त्यानंतर तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील रूममधील सर्व लाईट बंद करून प्रकाषाची तिव्रता कमी झालेवर

आमचे सुचनेवरून पोशि/राकेश जांभुळकर यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्यात आम्हा सर्वाचे हात अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता कोणाचाही हाताला निळसर रंगाची चकाकी दिसून येत नसल्याची गैरअर्जदारास खात्री करून देवून गैरअर्जदाराने त्याचे पॅन्टचे खिश्यात ठेवलेली रक्कम काढण्यास सांगून ते अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता नोटांना निळसर रंगाची चकाकी दिसून आल्याने आमचे व दोन्ही पंचाची लाच रक्कम असल्याची खात्री झाली. सदर नोटा पंच क्र. 2 यांना ताब्यात घेण्यास सांगितले. त्यांनतर गै.अ. सुदेश महाडोळे यांनी लाच रक्कम तक्रारदाराकडून स्विकारल्याने त्याचे दोन्ही हात व त्याने परिधान केलेल्या पॅन्टची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्याप्रकाशात तपासणी केली असता त्याचे दोन्ही हाताच्या बोटाचे टोकाला व पॅन्टचे मागील उजव्या बाजुच्या खिश्याला निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच तक्रारदार हिचे दोन्ही हात व पर्सची अल्ट्राव्हायलेट दिव्याचेप्रकाशात तपासले असता त्यांचे उजव्या हाताचे संपुर्ण बोटांना व पर्सचे समोरील खाण्यात निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.

गै.अ. सुदेश महाडोळे यांचे ताब्यातून मिळालेल्या लाच रक्कमेच्या नोटांचे क्रमांक पंच क्र. 2 यांनी वाचले व पंच क्र. 1 यांनी पंचनामा क्र. 1 मधील नमुद नोटाच्या क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता 5,000/-रूपये (ज्यात 500 रु दराच्या 10 नोटांचे क्रमांकाशी जुळुन आले. नमुद लाचरक्कम लिफाप्यामध्ये सुरक्षित ठेवून सिलबंद केल्यानंतर लाच रक्कमेचा लिफाफा आम्ही आमचे ताब्यात घेतला. त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंच व गै.अ. सुदेश महाडोळे यांनी सहया केल्यात.

त्यांनतर गै.अ. सुदेश महाडोळे यांची अंगझडती घेवून अंगझडतीत मिळुन आलेला वस्तुची वेगळी यादी तयार करण्यात आली. अंगझडतीत मिळुन आलेले साहित्य व रोख रक्कम आरोपींना वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर आम्ही, दोन्ही पंच आणि गै.अ. यांनी स्वाक्षरी केलेली आहे. गै.अ. यांचा मोबाईल आम्ही तपासकामी जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्याची तजवीज ठेवली. सदर बाबतची व्हिडीओ रेकाॅडीग करण्यात आली. सदरचे घटनास्थळ हे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, धुमनखेडा वार्ड, बाजार चैक पोलीस स्टेशन जवळ ब्रम्हपुरी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर येथिल आहे. त्यांनतर आम्ही पोशि/प्रदीप ताडाम यांना घटनास्थळाचा कच्चा नकाशा काढण्याबाबत सुचना देवून कार्यवाहीदरम्यान कोण कुठे होते त्याबाबत सविस्तर सागितले असता त्यांनी सदर घटनास्थळाचा कच्चा नकाशा तयार केला. त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यांनतर गै.अ. सुदेश महाडोळे यांचे वरिश्ठ अधिकारी श्रीमती मंदोधरा सुखदेवे, तालुका आरोग्य अधिकारी हे कार्यालयात हजर असल्याने त्यांना तसेच गै.अ. यांची पत्नी सौ. कल्पना सुदेश महाडोळे यांना फोनव्दारे गै.अ. यास ताब्यात घेतल्याची माहीती देण्यात आली. सदरचे ठिकाणी लोकांची गर्दी होत असल्याने कार्यवाहीमध्ये बाधा येवू नये याकरीता सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी हे लागुनच असल्याने आम्ही पुढील पंचनामा कार्यवाही करिता पो. स्टे ब्रम्हपुरी येथे जाण्याचे ठरवून 17/47 वा. तिथे पोहचलो.

त्यांनतर तक्रारदार हिची पंच क्र. 1 यांचे हस्ते अंगझडती घेवून मिळालेले साहीत्य व रोख रक्कमेच्या नोंदी घेतल्यानंतर मिळालेले साहीत्य परत करण्यात आले. तक्रारदार दोन्ही पंच व आम्ही अंगझडती यादीवर स्वाक्षरी केली.

यानंतर आम्ही, पंच क्र. 1 श्रीमती रश्मी मलकापुरे यांना सापळा कार्यवाहीवेळी तक्रारदार व गै.अ. श्री. सुदेश महाडोळे यांच्यात लाच देवाण घेवाण घेवाण झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, ''मी तक्रारदार यांचे सोबत कार्यालयात जात असता गै.अ. सुदेश महाडोळे यानी तक्रारदार हिला मागे जाण्याचा इशारा करून मला हाताने थांबण्याचा इशारा केल्याने मी थांबली. तेव्हा गै.अ. हा त्याचे खुर्चीवरून उठुन तक्रारदार हिचे मागे गेला व काही क्षणातच तक्रारदार व गै.अ. बाहेर आले तेव्हा गै.अ. हे लाच रक्कम पॅन्टचे मागील खिश्यात ठेवतांना दिसले. त्यांनतर तक्रारदार व गैरअर्जदार बाहेर आल्यानंतर मी तक्रारदार हिचे सोबत कार्यालयाच्या गेटचे बाहेर येवून सापळा पथकास नियोजीत इशारा करताच आपण त्याठिकाणी आले'' असे सांगितले. त्यावरून तक्रारदार हिने पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला.

तसेच तक्रारदार हिने सांगितले की, मी गै.अ. सुदेश महाडोळे यांनी ईषा-याने सांगितलेवरून त्याचे कार्यालयातील गॅलरीमध्ये गेली, तेव्हा ते माझे मागेच आले व दोन बोटाचे ईषा-याने पैष्याची मागणी केल्याने मी माझे जवळील पर्सचे समोरील खाण्यातुन लाच रक्कम 5,000/- काढून उजव्या हाताने गै.अ. सुदेश महाडोळे यांचेकडे देत ''तुम्ही सांगितल्याप्रमाणे पैसे आहे मोजुन घ्या'' असे म्हटल्याने त्यानी लाच रक्कम उजव्या हातानी स्विकारून ''असंणच, तुम्ही दिले तर'' असे म्हणाले. त्यांनतर मी व गैरअर्जदार हे तिथुन बाहेर निघालो त्यांनतर मी कार्यालयाचे गेटचे समोर येवून लाच रक्कम दिल्याचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले.

त्यांनतर आमचे सुचनेनुसार सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे गळयात अडकवून पाठविलेले व्हाईस रेकाॅर्डर पोहवा/हिवराज नेवारे यांनी लॅपटाॅपला कनेक्ट केले असता मेमोरी कार्डमध्ये Folder01 मध्ये

260610_1723 या नावाची फाईल दिसून आली. सदर फाईल का◌ॅपी केल्यानंतर आम्ही दोन्ही पंच, तक्रारदार यांचेसमक्ष व्हा◌ॅईस फाईल फा◌ॅरवर्ड करुन ऐकली. यानंतर आम्ही मपोशि/मेघा मोहुर्ले यांचे हस्ते सापळा कार्यवाही मध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान व्हाईस रेका◌ॅर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत करण्यात आलेल्या संभाषणाचे लॅपटा◌ॅपव्दारे शब्दश स्क्रिप्ट तयार करण्यात आली,
त्यानंतर सापळा कार्यवाहीचे मेमरीकार्ड मधील रेका◌ॅर्ड व्हाईस फाईल क्र. 260610_1723 याची लॅपटा◌ॅपमधील sevenza Hash calculator या सा◌ॅफ्टवेअरद्वारे हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढल्यानंतर त्या हॅश व्हॅल्यु प्रमाणपत्रावर दोन्ही पंचानी व पोहवा/हिवराज नेवारे यांनी समक्ष म्हणून सहया केल्या आहेत. सदर सापळा कार्यवाहीचेSanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5614MPअसे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करून एका कागदी लिफाज्यात सुरक्षित जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी स्वाक्षरी केल्यावर लाखेने सिलबंद केले. त्यांनतर पडताळणी कार्यवाहीचे मेमरी कार्डमधील रेका◌ॅर्ड व्हाईस फाईल क्र. 260610_1640 याची लॅपटा◌ॅपमधील sevenza Hash calculator या सा◌ॅफ्टवेअरद्वारे हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढल्यानंतर त्या हॅश व्हॅल्यु प्रमाणपत्रावर दोन्ही पंचानी व पोहवा/हिवराज नेवारे यांनी समक्ष म्हणून सहया केल्या आहेत. ते पडताळणी कार्यवाहीचेSanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5127XV8324VN असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करून एका कागदी लिफाप्यात सुरक्षित जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी स्वाक्षरी केल्यावर लाखेने सिलबंद केले.
तसेच आमचे सुचनेवरून पोहवा/रविकांत इंगळे यांनी सापळा कार्यवाही दरम्यान गै.अ. सुदेश महाडोळे यांनी लाच रक्कमेची जप्ती व त्याची अंगझडती कार्यवाहीचे चित्रीकरणाचेSanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5127XV8326Q0 असे प्रींट असलेले मेमोरी कार्डSony कंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरा लॅपटा◌ॅपला कनेक्ट केले असता MP_ROOT या मध्ये 100ANV01 या नावाचे फोल्डरमध्ये MAH00041 या नावाच्या व्हिडीयो फाईल दिसुन आली. त्यां फाईलचे sevenza Hash calculator सहायाने हॅशव्हॅल्यु काढून प्रिन्ट काढली. त्यावर दोन्ही पंचानी व पोहवा/रविकांत इंगळे यांनी समक्ष म्हणून सही केल्यानंतर कागदपत्रात समाविश्ट केली. सदर फाईल्स असलेले सदरचे मेमरी कार्ड एका कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवले. सदर लिफाप्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केल्यावर लिफापा लाखेने सिलबंद करुन आम्ही आमचे ताब्यात घेतला.
त्यानंतर गै.अ. सुदेश महाडोळे यांना झालेल्या पडताळणी /सापळा कार्यवाहीबाबत त्यांचे काय म्हणणे आहे? याबाबत लेखी निवेदन लिहून देण्याकरीता सांगितले व कोरे कागद आणि पेन त्यांना उपलब्ध करून दिले. त्यावरून त्यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरातील निवेदन आम्हास सादर केले. सदर निवेदनावर दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली.
त्यांनतर गै.अ. सुदेश महाडोळे यांचेकडून ताब्यात घेण्यात आलेला विवो कंपनीच्या मोबाईलची पाहणी करून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले. तसेच त्यांनी घटनेवेळी परिधान केलेला सिमेंट रंगाचा, समोरील व मागील दोन्ही बाजुस खिसे असलेला फुलपॅन्ट पुरावेकामी जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले. त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी व गै.अ. सुदेश महाडोळे यांनी सहया केल्यात.
तरी यातील ईलोसे सुदेश ज्ञानेश्वर महाडोळे वय 40 वर्षे, धंदा नोकरी पद तालुका समुह संघटक,(कंत्राटी) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर यांनी तक्रारदार महिलेचे आशा वर्कर कामाचे प्रोत्साहन भत्ता बिलाची अंतीम तपासणी करून ते बिल समोर पाठविल्याने बिल मंजूर झाल्याचे सांगून काम करून देण्याचे मोबदल्यात 5,000/- लाच रक्कमेची मागणी करून स्वतः लाच स्विकारल्याने त्यांचेविरुदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, (सुधारणा 2018) कलम 7 अन्वये कायदेशीर कार्यवाही होणेकरीता माझी कायदेशीर फिर्याद आहे.

(
अनिल जिट्टावार )
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत
प्रतिबंधक विभाग चंद्रपूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Pramod Govindrao Banbale(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Pramod Govindrao E
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

11.6.26

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

स्टेशन डायरी अंमलदार
पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)